मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

Azadi Ka Amrit Mahotsav

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२४-२५/४८८
दिनांक : २९.०६.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय** : स्वंयनिर्वाह राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयाअंतर्गत शासकीय अनुदानीत राष्ट्रीय सेवा योजना एककांबाबत.....

मा.महोदय/महोदया,

राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो, महाराष्ट्र शासन यांनी अनुदानित व स्वंयनिर्वाह रासेयो एकक बाबतचे २०२४-२५ या सत्रासाठी महाविद्यालयाचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाअंतर्गत स्वंयनिर्वाह (Self Finance NSS Unit) रासेयो एकक महाविद्यालयांना जर शासकीय अनुदानीत एकक हवे असल्यास तसे प्रस्ताव विद्यापीठ रासेयो कक्षाकडे सादर करावेत.

शासकीय अनुदानीत राष्ट्रीय सेवा योजना एककांसाठी संबंधीत महाविद्यालयांनी नजीकच्या State Bank of India शाखेमध्ये Zero Balance Subsidiary Account-(ZBSA) Current Account खाते उघडणे आवश्यक आहे. त्यासंबंधीच्या मार्गदर्शक सुचना/दस्तावेज आपल्याला पाठविण्यात येतील तसेच संबंधीत विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा/विभागीय समन्वयक महाविद्यालयाला संबंधीत (ZBSA) खाते उघडण्यास मदत करतील.

शासकीय अनुदानीत रासेयो एकक अंतर्गत (ZBSA) खाते उघडल्यानंतर महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजना नियमित व विशेष शिबिर अनुदान परस्पर ZBSA मध्ये जमा करण्यात येईल, त्यामुळे शासकीय अनुदानीत राष्ट्रीय सेवा योजना एककांस रासेयो नियमित व विशेष शिबिराचे अनुदान संबंधित वित्तीय वर्षात प्राप्त होईल.

तरी स्वंयनिर्वाह रासेयो एककांना शासकीय अनुदानीत राष्ट्रीय सेवा योजना एकक हवे असल्यास त्यांनी त्वरीत राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ कक्षास किंवा जिल्हा समन्वयक यांचेशी संपर्क साधावा.

शासकीय अनुदानीत राष्ट्रीय सेवा योजना एकक हे शासनाने निर्गमित केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार वितरीत करण्यात येईल.

कळावे,

आपला,

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**